**प्रेसनोट दि. ०६.०१.२०२१**

श्री. विलास भरमन्ना चव्हाण वय ४८ वर्ष तलाठी, दरिबडची, जत, सांगली यांना ५००/- रुपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले. सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार यांचे भावाचा इकराराची नोंद घेवुन इकरार देण्याकरीता दरीबडची, जत येथिल तलाठी श्री. चव्हाण यांनी तक्रारदार यांचेकडे ५००/- रूपयेची लाच मागणी केली असल्याबाबत तक्रारदार यांनी इकडील कार्यालयाकडे तक्रार दिली होती.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार आज दिनांक ०६.०१.२०२१ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये तलाठी श्री. चव्हाण यांनी तक्रारदार यांच्याकडे चर्चेअंती ५००/- रूपये लाचेची मागणी करून लाच रक्कम घेवून येण्यास सांगीतलेचे निष्पन्न झाले.

त्यानंतर लागलीच तलाठी कार्यालय दरीबडची, जत येथे सापळा लावला असता श्री. विलास भरमन्ना चव्हाण वय ४८ वर्ष तलाठी, दरिबडची, जत, सांगली वर्ग-३ यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून तक्रारदार यांचेकडून ५००/- रूपये लाच रक्कम स्विकारले असताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

त्याअनुषंगाने श्री. विलास भरमन्ना चव्हाण वय ४८ वर्ष तलाठी, दरिबडची, जत, सांगली वर्ग-३ यांचे विरुध्द जत पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे सो़ पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, व श्री सुहास नाडगौडा सो़ अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुजय घाटगे सो पोलीस उप अधीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो सांगली श्री. प्रशांत चौगुले पोलीस निरीक्षक तसेच पोलीस अंमलदार सपोफौ रविंद्र धुमाळ, पो.हे.सलीम मकानदार, संजय संकपाळ, संजय कलकुटगी, पो.ना. प्रितम चौगुले, धनंजय खाडे, पो.कॉ. सुहेल मुल्ला, मपोशि विना जाधव, चालक पवार यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स ॲप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल ॲप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

Scanned by CamScanner